| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| CNR No.**MHKO200000902024** | दाखल तारीख | – | २२ | ०२ | २०२४ |
| | नोंदणी तारीख | – | २३ | ०२ | २०२४ |
| | निकाल तारीख | – | १५ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०२ | ०२ | २३ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**
**यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक १०/२०२४.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक २३/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– १५ मे २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.१३०/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे

| | |
|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत कळे पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | संजय हिंदूराव कांबळे, व.व.३६, |
| | रा. पोर्ले तर्फे बोरगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे वकील | ॲड. यु.बी.व्हरांबळे |

**भाग–ब**
**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २१.१०.२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २१.१०.२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २२.०२.२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ११.०७.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १६.०३.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय हिंदुराव कांबळे | फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस | ११.०७. २०२४ | भा.द.सं. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – |

**<u>भाग–क</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | विकास भिवा कांबळे | घटनास्थळ पंच | १४ |
| २. | अर्चना धोंडीराम कांबळे | साक्षीदार | १६ |
| ३. | मंगल संजय कांबळे | फिर्यादी | १७ |
| ४. | भिवा शंकर कांबळे | साक्षीदार | २० |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | निरंक | –– | –– |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | निरंक | –– | –– |

## अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

### अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १५ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | १८ | फिर्याद |
| ३. | १९ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ४. | २१ | मंगल संजय कांबळे यांचे एम.एल.सी. वैद्यकीय प्रमाणपत्र (आरेपीतर्फे मान्य केले) |

### ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

### क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १० | आरोपीचे निवेदन |
| ३. | २२ | आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

### ड. भौतिक वस्तु

| अ.क्रं. | मुद्देमाल अर्टीकल नं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | आर्टीकल अ | बांबूची काढी एक तिची लांबी ३४ इंच असलेली गोलाकार |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक १५ मे २०२६ रोजी घोषित)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२३,३२४,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

०२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी मंगल संजय कांबळे मूळ रा. पोर्ले तर्फे बोरगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर हे तिचे सासर असून सध्या ती रा. वाशी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे राहते. पोर्ले तर्फे बोरगांव गावचे कायम स्वरूपी रहिवासी असून तिच्या सासरी तिचा नवरा संजय हिंदुराव कांबळे, सासू आक्काताई व मुली शर्मिला, गायत्री व कल्याणी व मुलगा हर्षवर्धन असे एकत्रात राहण्यास आहे. तिच्या लग्नाला १६ वर्षे झाली आहेत. तिचा नवरा गवंडी काम करत असून ती सध्या हॉटेल रंजनराज येथे सफाई कामगार म्हणून कामास आहे. तिचा नवरा दारूचे व्यसन करत असून तो तिच्यावर संशय घेत असतो. ऑगस्ट २०२३ मध्ये तिच्या नव-याने ती सासरी असताना तिला मारहाण केली म्हणून ती तिच्या मुलाबाळांसह माहेरी वाशी, ता. पन्हाळा येथे राहण्यास गेली होती. दि. २१.१०.२०२३ रोजी सायंकाळी ७ वाजणेच्या सुमारास हॉटेल रंजनराज कळे येथून माहेरी जाण्यासाठी कुंभारवाडा चौक कळे येथे आली असता तिचा नवरा त्याठिकाणी आला व त्याने तिला तु नांदायला का येत नाही असे म्हणू लागला. त्यावेळी फिर्यादी त्याला तुम्ही दारू प्यायची सोडून दया असे सांगू लागली. तेव्हा आरोपी फिर्यादीशी वाद घालू लागला. त्यानंतर फिर्यादी व आरोपी एस.टी. ने सासरच्या घरी सायंकाळी ७.३० च्या सुमारास आले असता नव-याने तिच्याशी पुन्हा वाद घालून तिला व तिच्या माहेरच्या लोकांना शिवीगाळ करून फिर्यादीला हाताने मारहाण करून घरातच पडलेली काठी हातात घेवून तिच्या पाठीत, पायावर मारहाण करून तु मला सोडचिठ्ठी दिली नाहीस तर तुला सोडणार नाही असे म्हणू लागला. फिर्यादीने सदरच्या घटनेबाबत तिच्या बहिणीला व चुलत्याला कळविले. त्यानंतर तिचे चुलते भिवा शंकर कांबळे, दाजी शंकर कांबळे व चुलत भाउ सचिन दाजी कांबळे असे पोर्ले तर्फे बोरगांव गावी येवून त्यांनी फिर्यादीला त्यांच्या मोटरसायकल वरून तक्रार देण्याकरीता पोलीस स्टेशनला घेवून आले होते. सदरच्या घटनेमुळे तिला चक्कर आल्याने उपचाराकरीता तिला प्राथमिक आरोग्य केंद्र कळे येथे नेण्यात आले. त्यानंतर तिच्यावर उपचार झाले.

तिने कळे पोलीस स्टेशनमध्ये आरोपीविरूध्द तक्रार नोंदविली.

**०३.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द कळे पोलीस ठाणे गु.र.क्र. १३०/२०२३ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल व्ही.व्ही.कुंभार यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा नोंदवला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, सदर गुन्हयातील बांबुची काठी जप्त केली. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र व इतर कागदपत्र प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०४.** आरोपीविरुध्द नि.क्र. ९ नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२३,३२४,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला व आरोपीस दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नोंदविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण चार साक्षीदारांचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. पुरेशी संधी दिलेनंतर तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन नि.क्र.१ कडील दि.२४/०३/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. तद्नंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.२२ कडे नोंदवले असता आरोपीने काही सांगितले नाही. आरोपीने आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.२१/१०/२०२३ रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास पोर्ले तर्फे बोरगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील फिर्यादीच्या घरात आरोपी संजय हिंदूराव कांबळे यांनी फिर्यादीस मारहाण केली व इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली. त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी येथील फिर्यादीच्या घरात आरोपी संजय हिंदूराव कांबळे यांनी फिर्यादीस प्राणघातक बांबूची काठीने मारहाण केली व इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली. त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीचा अपमान केला व तिला प्रक्षोभित होईल असे बोलल्याने सार्वजनिक शांततेचा भंग केला आणि याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ५०४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीचा अपमान केला व तिला प्रक्षोभित होईल असे बोलले व जिवे मारणेची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | आरोपीची |

| | | |
|---|---|---|
| | | निर्दोषमुक्तता करणेत येते. |

## का र ण मि मां सा

**प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ करीताः**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.३ मंगल संजय कांबळे **(फिर्यादी व जखमी/नि.क्र.१७)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपी हे तिचे पती आहात. सन २००६ साली तिचे आरोपीसोबत लग्न झाले. त्यांना लग्नसंबधातुन तीन मुली व एक मुलगा झालेला आहे. तिचा नवरा गवंडी काम करतो. तिच्या पतीला दारुचे व्यसन आहे. तिचे पती तिला दारु पिऊन मारहाण करणे, घराबाहेर काढणे, उपाशी ठेवणे व तो तिला शारीरीक व मानसिक त्रास देत होता. म्हणुन ती मुलांना घेवुन माहेरी राहणेस गेली. दि२१/१०/२०२३ रोजी रात्री ७.०० चे सुमारास ती कामावरुन बस ने वाशी येथे चालली होती. त्यावेळी आरोपी तिच्या बसमध्ये बसला होता. बस मधुन उतरल्यावर आरोपीने तिला काठीने मारहाण करणेस सुरुवात केली. त्यानंतर तिने तिच्या बहिणीला फोन करुन घडलेला प्रकार सांगितला व घरातील लोकांना पाठवून दया असा निरोप दिला. त्यानंतर तिला उपचाराकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र कळे या ठिकाणी नेण्यात आहे कारण ती बेशुध्द अवस्थेत होती. उपचारानंतर मी कळे पोलिस स्टेशनला

आरोपींविरुध्द फिर्याद दिली.जबाबावेळी तिला सदरची फिर्याद (नि.क्र.१८) दाखवली ती तीच आहे. त्यावर तिची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जबाबावेळी तिला छापील प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.१९) दाखवला तो तोच आहे. आरोपीने ज्या काठीने मारहाण केली ती आर्टीकल अ वर दाखल असलेली काठी दाखवली असता ती तीच आहे असे कथन केले

**०९.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ फिर्यादी मंगल संजय कांबळे यांनी आरोपी तर्फे घेण्यात अलेल्या उलटतपासात असे मान्य केले की, सदर हॉटेलच्या समोर बस स्टॉप आहे. ती गेली ४ वर्षापासून वाशी येथे राहते. प्रस्तुत घटना घडण्यापूर्वी ती सासरी नांदायला गेली होती. मारहाणीची घटना रात्री ७.३० ते ७.४५ च्या सुमारास घडली. हॉटेलच्या शेजारी स्टॉप असून त्या ठिकाणी वर्दळ असते. आरोपी तिला अर्धा तास मारीत होता. सदर मारहाणीत तिचा डावा हात मोडला होता. आरोपीने मारहाण केल्यानंतर फिर्यादी बेशुध्द पडल्याने तिच्या वतीने तिची बहिण अर्चना हिने फिर्याद दिलेली आहे. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नाकबुल उत्तरे नोंदविली.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ विकास भिवा कांबळे **(घटनास्थळ पंच/नि.क्र.१३)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.२२/१०/२०२३ रोजी पोलिसांनी त्याला पंचनामा करणेसाठी पोर्ले गावात त्याच्या बहिणीच्या घरी बोलावले होते. आरोपीने त्याची बहिण नामे मंगल कांबळे हिला एस.टी. तुन जात असताना मारहाण केली होती. सदरचे ठिकाण बाजार भोगाव येथे होते. पोलीसांनी त्या ठिकाणी घडलेल्या प्रकारचा पंचनामा नोंदवला. पोलिसांनी दिसत्या वस्तुस्थितीचा पंचनामा नोंदवला. जबाबावेळी त्याला सदरचा पंचनामा (नि.क्र.१५) दाखवला तो तोच आहे. त्यावर त्याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पोलीसांनी त्याच्या समक्ष काठी जप्तकेली. सदरची काठी (आर्टीकल अ) त्यांना दाखवणेत आली ती तीच आहे असे कथन केले.

**११.** अभियोग पक्षातपर्फे साक्षीदार क्र.१ विकास भिवा कांबळे यांचा आरोपी तर्फे घेणेत आलेल्या उलटतपासात त्यांनी असे मान्य केले की, फिर्यादी मंगल ही त्यांची सख्खी चुलत बहिण आहे. फिर्यादीला आरोपीने ज्या एस.टी. तून जाताना मारहाण केली. त्या एस.टी.चा नंबर त्यांना सांगता आला नाही. सदरची मारहाण बाजार भोगाव ते पोर्ले जाणा–या रस्त्यावर झाली. त्यांच्यासोबत दुसरे पंच त्यांचे वडील भिवा कांबळे देखील हजर होते. नि. १५ वर घटनास्थळ पंचनाम्यात दुसरे पंच भिवा कांबळे यांचे नाव नाही. घटनास्थळ पंचनाम्यात आरोपीने फिर्यादीला एस.टी. बसमधून जात असताना मारहाण केली ही बाब नमूद नाही. त्यांनी तयार पंचनाम्यावर सही केली अशी कबूली दिली.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ अर्चना धोंडीराम कांबळे **(साक्षीदार/नि.क्र.१६)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, तिचे माहेर वाशी असून त्याठिकाणी तिचे आई–वडिल, भाऊ व त्यांचे कुटूंबिय राहतात. संजय कांबळे हा त्याची बहिण मंगल कांबळे हिचा नवरा असून तो तिचा सख्खा मेव्हणा आहे. त्याची बहिणी मंगल व आरेपी संजय कांबळे यांच्यावैयक्तिक मदभेद आहेत त्यामुळे त्याची बहीण माहेरी वाशी येथे राहते. दि २१/१०/२०२३ रोजी रात्री ७.४५ वाजताचे सुमारास त्याची बहिण मंगल हिचा फोन आला व तिने त्याला फोनवरुन आरोपी संजय हा तिला मारहाण करत असल्याचे सांगितले. तसेच तो तिला वाशीतुन पोर्ले येथे जबरदस्ती घेवुन गेला. तो मारहाण करत असल्याने कुणाला तरी पाठवून दया असा तिने त्याला निरोप दिला. त्यानुसार त्याने त्याचे चुलते भिमराव कांबळे, विकास कांबळे व रंगराव कांबळे यांना पाठवुन दिले. त्याच्या भावाने मंगलला बोलता येत नाही तु ये असा निरोप दिल्याने तो देखील कळे पोलिस स्टेशनला आला. त्यावेळी तिला पोलीस यादी दिली व उपचार घेण्यास सांगितले. उपचार घेतल्यानंतर तिने फिर्याद दिली.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ अर्चना धोंडीराम कांबळे **(साक्षीदार/नि.क्र.१६)** यांनी आरोपीतर्फे घेतलेल्या उलटतपासात असे मान्य केले की, त्यांचे शिक्षण काहीही झाले नसून फिर्यादी मंगल ही त्यांची सख्खी बहिण आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यात वैयक्तिक मतभेद आहेत. ते मतभेद कोणत्या कारणावरून आहेत याविषयी त्यांनी अभिज्ञता दर्शविली. आरोपीने फिर्यादीला वाशीतून पोर्ले येथे जात असताना कोणत्या तारखेला मारहाण केली हे देखील त्यांना सांगता आले नाही. फिर्यादीचा फोन आल्यानंतर त्या परस्पर पोलीस स्टेशनला पोहोचल्या. फिर्यादीची त्यादिवशी जबाब व फिर्याद देण्याची मनस्थिती नव्हती कारण तिला बोलता येत नव्हते. तिच्या वतीने सदर साक्षीदार अर्चना हिने फिर्याद दिली.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ भिवा शंकर कांबळे (साक्षीदार/नि.क्र.२०) यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, सिताराम हा त्यांचा भाउ असून त्यांना दोन मुली व एक मुलगा आहे. फिर्यादी मंगल कांबळे ही त्यांची पुतणी आहे. ते व त्यांचा भाउ सिताराम हे एकत्र राहत असल्याकाराणाने ते त्यांचे घर एकत्र चालवतात. ते आरोपीला ओळखतात कारण आरोपी हा त्यांच्या पुतणीचा नवरा आहे. फिर्यादी मंगल व आरोपी संजय कांबळे यांच्यात गेली ४ वर्षापासून वैयक्तिक वाद असून ती ४ वर्षापासून वाशी येथे राहते. दि. २१.१०.२०२३ रोजी रात्री ७.४५ च्या सुमारास मंगलने अर्चनाला फोन केला व फोनवरून मारहाणीच्या घटनेबाबत सांगितले. त्यानंतर अर्चनाने सदर साक्षीदार भिवा कांबळे यांना फोन करून घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर सदर साक्षीदार त्यांचा, मुलगा विकास, दाजी शंकर कांबळे, सचिन दाजी कांबळे असे मिळून पोर्ले येथे आरोपी संजय कांबळे यांच्या घरी गेले. त्यावेळी मंगल बेशुध्द अवस्थेत पडली होती व त्याठिकाणी त्यांना काठी पडलेली दिसली होती. फिर्यादीला घेवून ते पोलीस स्टेशनला आले व पोलीसांनी यादी दिल्यावर तिच्यावर उपचार घेतले व त्यानंतर आरोपीविरूध्द फिर्याद

दिली. त्यांनी साक्षीदरम्यान आर्टिकल अ वर दाखल असलेली काठी ती तिच असल्याचे सांगितले.

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ भिवा शंकर कांबळे **(साक्षीदार/नि.क्र.२०)** यांनी आरोपीतर्फे घेतलेल्या उलटतपासात असे मान्य केले की, फिर्यादी ही त्यांची पुतणी असून पोर्ले तर्फे बोरगाव याठिकाणी सदर साक्षीदार, विकास कांबळे, दाजी शंकर कांबळे व सचिन कांबळे असे गेले होते. फिर्यादी अर्चना ही पोर्ले येथील घरी बेशुध्द पडली होती. संजय धोंडीराम कांबळे या नावाची दुसरी व्यक्ती पोर्ले गावात असू शकते असे सांगितले. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नाकबूल उत्तरे नोंदविली.

**१६.** एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.३ फिर्यादी अर्चना धोंडीराम कांबळे ही आरोपीची पत्नी असून फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये गेली ४ वर्षापासून वैयक्तिक वाद असून ती गेली ४ वर्षापासून तिच्या माहेरी वाशी येथे राहते. परंतु तिने उलटतपासादरम्यान प्रस्तुत घटना घडने पूर्वी ती सासरी नांदायला गेली होती. मारहाणीनंतर तिच्यावर उपचार झाले. त्यावेळी ती बेशुध्द होती. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद तिच्यावतीने तिची बहिण अर्चना हिने दिली. आरोपीला दारू पिण्याचे व्यसन असून तो फिर्यादीला वरचेवर मारहाण करीत असल्याची बाब समोर येते. साक्षीदार क्रं. १ विकास भिवा कांबळे हे घटनास्थळावरील पंच असून ते फिर्यादी मंगल कांबळे हिचे चुलत भाउ आहेत. त्यांनी नि. १५ वर घटनास्थळ पंचनाम्यात दुसरे पंच त्यांचे वडील भिवा कांबळे यांचे नाव नमूद नसल्याचे मान्य केले. त्याचबरोबर घटनास्थळ पंचनाम्यात आरोपीने फिर्यादीला एस.टी. बसमधून जात असताना मारहाण केली ही बाब देखील नमूद नाही. त्यांनी पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर सही केली अशी कबूली दिली.

**१७.** साक्षीदार क्रं.२ अर्चना धोंडीराम कांबळे ही फिर्यादीची सख्खी बहिण असून तिने देखील फिर्यादी व आरोपी यांच्यात वैयक्तिक मतभेद आहेत ते मतभेद कोणत्या कारणावरून आहेत याविषयी तिला माहित नसल्याचे तिने सांगितले. आरोपीने फिर्यादीला कोणत्या दिवशी मारहाण केली हे त्यांना सांगता आले नाही. फिर्यादीची त्यादिवशी जबाब व फिर्याद देण्याची मनस्थिती नसल्याने व तिला बोलता येत नसल्याने त्यांनी फिर्यादीच्या वतीने फिर्याद दाखल केली आहे. सदर साक्षीदार ही फिर्यादीची सख्खी बहिण असून फिर्यादी व आरोपी यांच्यामधील वैयक्तिक मतभेदाविषयी किमान त्यांना माहित असणे अपेक्षित आहे. साक्षीदार क्र ४ भिवा शंकर कांबळे हे फिर्यादीचे चुलते असून फिर्यादी ही बेशुध्द पडली होती ही बाब मान्य केली. त्याचबरोबर घटना घडली त्यावेळी ते घटनास्थळावर हजर नव्हते हे देखील कबूल केले.

**१८.** आरोपीचे विधीज्ञांनी फिर्यादीचे वैदयकीय प्रमाणपत्र मान्य केले. प्रस्तुत प्रकरणातील तपासी अंमलदार व्ही.व्ही. कुंभार यांना वारंवार समन्स पाठवून देखील ते साक्षकामी हजर झाले नाहीत. एकंदरीत फिर्यादी व आरोपी त्याचबरोबर साक्षीदार क्रं. १ ते ४ यांच्यातील नातेसंबंध लक्षात घेता तपासी अंमलदार यांनी प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यात गेली काही वर्षापासून मतभेद असल्याकारणाने प्रस्तुतची फिर्याद दाखल झाल्याचे समोर येते. एकंदरीत फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये प्रस्तुत प्रकरणाव्यतिरिक्त किरकोळ वाद असल्याचे त्यांनी मान्य केले. सदर वादांची उत्पत्ती म्हणजेच प्रस्तुतची केस असल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत अभिलेखावर दाखल असलेला पुरावा हा आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरीता अपुरा असल्याने त्याचा फायदा निश्चितच आरोपीच्या पक्षास जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **प्रश्नबिंदू क्रं.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवते.**

**<u>प्रश्नबिंदू क्र.५ करीताः</u>**

**१९.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२३,३२४, ५०४, ५०६ अन्वये आरोपीवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल बांबूची काठी या अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे त्यांचा नाश करण्यात यावा. सबब, प्रश्नबिंदू क्र.५ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी संजय हिंदुराव कांबळे रा. पोर्ले तर्फे बोरगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता कलम ३२३,३२४, ५०४, ५०६ चे अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

४. जप्त मुद्देमाल एक बांबूची काठी हिचा अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Viashali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.15 14:20:39 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक – १५.०५.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर